# शाकुंतल

**ना. सी. फडके**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**शाकुंतल : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ १५०/-

# शाकुंतल

# प्रस्तावना

माझ्या कादंबरीला मी प्रस्तावना कधी लिहीत नाही. परंतु या कादंबरीच्या या दुसऱ्या आवृत्तीत कांही गोष्टी वाचकांना सांगाव्याशा वाटतात, म्हणून ही प्रस्तावना लिहीत आहे.

१९४२ साली ऑगस्ट महिन्याच्या ७ व्या तारखेस ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचं अधिवेशन मुंबईस भरलं. या अधिवेशनांत सुप्रसिद्ध 'चले जाव'चा ठराव पास झाला. ता. ९ ऑगस्ट रोजी अरुणोदयाच्या पहिल्या घटकेस गांधीजी आणि काँग्रेसच्या कार्यकारिणीचे सर्व सभासद पकडले गेले, आणि त्या सर्वांची अज्ञातस्थळी रवानगी झाली. मुंबई शहरांत दंगे उसळले. त्यांच्या बंदोबस्तासाठी सरकारनं जालीम उपायांची योजना केली. भारतीय जनता आणि ब्रिटिश राज्यकर्ते यांच्यांत जो रणसंग्राम पुढे साडेतीन वर्षं चालू राहिला, त्याचा अशा प्रकारे प्रारंभ झाला.

त्या वेळी माझं वास्तव्य कोल्हापूरला होतं. देशभर उसळलेला चळवळीचा वणवा कोल्हापूरांतही दिसू लागला. महात्माजी आणि कार्यकारिणीचे सभासद यांच्या आकस्मिक अटकेबद्दल वाटणारा तीव्र संताप लोक व्यक्त करूं लागले. प्रचंड सभा भरू लागल्या. मोठमोठी निदर्शनं होऊ लागली. ता. १५ ऑगस्ट रोजी सभा मिरवणुकीवर बंदी घालणारा वटहुकूम देशांत जिकडे तिकडे जारी झाला. पण तरीदेखील दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवार दि. १६ ऑगस्ट रोजी तिसऱ्या प्रहरी 'खासबाग मैदान' या नावानं प्रसिद्ध असलेल्या राजाराम कॉलेजच्या भव्य क्रीडांगणावर खूप मोठी सभा भरली. ही सभा कोणी घेतली होती ते सांगणं कठीण होतं. कदाचित तिची जाहिरात मुळींच झालेली नसेल, व लोक स्वयंस्फूर्तीनं जमले असतील. प्रक्षोभाच्या त्या दिवसांत त्या क्रीडांगणावर रोजच सभा भरत होत्या. हजारों नागरिक आणि विद्यार्थी रोजच जमा होत होते. त्यामुळें रविवारची ती सभा कोणी बोलाविली याची चवकशी न करता रोजच्याप्रमाणे हजारो लोक जमा झाले होते.

सभेंत होणारी भाषणं ऐकण्यांत ते हजारों लोक गढलेले होते. पोलिस आणि लष्करी लोक यांच्या ज्या हालचाली सुरू होत्या त्याची त्यांना दाद नव्हती. खासबाग मैदानाच्या पश्चिमेस सुमारें दोनशे यार्डांच्या अंतरावर असलेल्या पॅलेस थिएटरपुढील प्रशस्त आंगणांत लाठीवाल्या पोलिसांनीं भरलेल्या लॉऱ्या येऊन उभ्या राहिल्या होत्या, खासबाग मैदानाच्या वसाहतीभोंवतीं सर्व बाजूंनी लष्करी घोडेस्वारांचा वेढा पडत होता…

या प्रकाराची लोकांना काहीच कल्पना नव्हती. सभेतली भाषणं संपली. अखेरचं वंदे मातरम् गीत सुरू झालं. लोक उठून उभे राहिले. आणखी दोन मिनिटांतच सभा आटपली असती. लोक घरोघर निघून गेले असते.

पण तितक्यांत हातांत लाठ्या घेतलेल्या पोलिसांची एक मोठी तुकडी पश्चिमेच्या बाजूनं खासबाग मैदानांत घुसली. या तुकडीच्या अग्रभागी हातांत पिस्तुल घेतलेले डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस आणि डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट होते. दोघेही दौडत होते आणि ''पकडा! मारा!'' अशा आरोळ्या ठोकीत होते.

त्या आरोळ्या ऐकून सभेसाठी जमलेले लोक चमकले. त्यांनी वर पाहिलं. लाठीमार करण्याच्या उद्देशानें पोलिस धावून येत आहेत असं पाहिल्याबरोबर ते सभा सोडून जाऊं लागले. लोकांची सर्व दिशांनी धांवाधांव सुरू झाली. परंतु त्यांच्या लवकरच लक्षात आलं की क्रीडांगणातून बाहेर पडण्याच्या साऱ्या वाटा घोडेस्वारांकडून आधीच रोखल्या गेल्या होत्या. पोलिसांनी सभेवर हल्ला करून लाठीमार सुरू केला. कांही लोक घोडेस्वारांच्या वेढ्यांतूनही वाट काढून आजूबाजूच्या घरांत आश्रयासाठी शिरले. पण पोलिसांनी घराघरांत शिरून त्यांना मारपीट करण्यास कमी केलं नाही. या निर्घृण लाठीमारांत कित्येक मुली देखील सांपडल्या.

खासबाग मैदानावरील या प्रकाराची बातमी शहरांत ताबडतोब पसरली, आणि शहराच्या निरनिराळ्या भागांतून लोकांच्या मोठमोठ्या झुंडी खासबाग मैदानाकडे निघाल्या. प्रक्षुब्ध जमावाची आणि पोलिसांची झटापट अनेक ठिकाणी झाली. रविवार पेठेच्या मोठ्या चौकांत बिंदु नारायण कुळकर्णी या नांवाचा एक कोवळा तरुण लाठीमारानं ठार झाला. या चौकाला आतां 'बिंदु नारायण चौक' असं नांव पडलेलं असून कोल्हापूरच्या बहुतेक मोठमोठ्या सभा या चौकांत भरत असतात.

खासबाग मैदानावर सुरू झालेला लाठीमार पाहून मी त्या ठिकाणी धांव घेतली होती, आणि डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस यांना हटकून विचारलं होतं ''हे तुम्ही काय चालविलं आहे?'' कारण नुसता लाठीमारच मला दिसत नव्हता, तर मैदानासभोवतींच्या घरांवर रायफली रोखून 'फायर'च्या हुकुमाची वाट बघत असलेले पोलिसही मला दिसत होते. त्या दिवशी सकाळीच मी असं ऐकलं होतं की या पोलिस अधिकाऱ्यांनी कांही वर्षांपूर्वी सोलापूर येथे निरपराध लोकांवर गोळीबार करण्याची मर्दुमकी गाजविली होती व ''कोल्हापूरचं सोलापूर करून दाखवितो'' अशी त्यांनी प्रतिज्ञा केली होती. घरांवर रोखलेल्या रायफलींना उद्देशूनच मी त्या अधिकाऱ्यांना विचारलं, ''हे तुम्ही काय चालविलं आहे?'' त्यांनी मला झटकून दूर लोटलं, आणि दरडावून सांगितलं की, ''आम्ही चाहेल ते करू. तुम्ही दूर हटा.'' मी त्यांच्यापासून दूर न होता आणखी बोलू लागलो तेव्हा ते माझा हात धरून म्हणाले, ''तुम्हाला आम्ही अटक केली आहे असं समजा.''

डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट जवळच होते. त्यांच्याकडे वळून मी विचारलं, ''माझ्यावर वॉरंट आहे काय? आणि असेल तर तें मला दाखवाल काय?'' त्यांनी मला उत्तर दिलं, ''ह्या वेळेस हा प्रश्न तुम्ही विचारायचा नाही.'' मी त्यांना म्हटलं, ''पुढे वेळ आली तर कोर्टात मी तुमचं हें उत्तर सांगितलं तर त्याला तुमची हरकत नाहीं ना?'' त्यांनी उत्तर दिलें ''नाही.'' मला एका पोलिस व्हॅनमध्ये बसण्यास सांगण्यांत आलं, आणि मला पोलीस हेडक्वॉर्टर्समध्ये नेण्यात आलं.

गांवात बातमी पसरली की खासबाग मैदानावर गोळीबार झाला असून मला गोळी लागलेली आहे. ही बातमी समजल्यामुळे गावांत आणि विशेषत: विद्यार्थ्यांत मोठी खळबळ उडाली. खुद्द महाराणीसाहेबांच्या पर्यंत ही बातमी पोचली. मला गोळी वगैरे काही लागलेली नसून नुसतं पकडण्यांत आलेलं आहे हें कळल्यावरून त्या समाचारासाठी पोलिस हेडक्वार्टर्सवर आल्या. त्या वेळेचे कोल्हापूरचे प्राईम मिनिस्टर मि. पेरी देखील आले. शिक्षणखात्याचे मंत्री बॅ. केळवकर येऊन मला म्हणू लागले, ''तुम्हांला अटकेंत ठेवण्याची आमची इच्छा नाही. पण यांतून आता मार्ग कसा काढायचा तें सांगा.''

त्यांच्या प्रश्नामागचा अभिप्राय मला कळत होता. वॉरंट वगैरे कांही एक न बजावता, किंवा कोणत्या आरोपाखाली मला पकडण्यात आलं तेही न सांगता

केवळ लहरीपणानं मला अटक करण्याची जी दंडेली डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस आणि मॅजिस्ट्रेट या दोघांनी केली होती ती वरिष्ठ अधिकाऱ्यांना पसंत नव्हती. गेल्या दहा बारा दिवसांत शहरांत आधीच फार अस्वस्थता माजलेली होती. माझ्या अटकेमुळे जनतेचा हा प्रक्षोभ अधिकच वाढेल–विशेषत: कॉलेजांतले आणि शाळांतले विद्यार्थी संतप्त होतील, आणि शहरांतली व भोवतालच्या भागातली परिस्थिती आटोक्याबाहेर जाईल, या गोष्टी वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळत होत्या. परंतु त्या कळत असल्या तरी माझी ताबडतोब मुक्तता करून चुकीची दुरुस्ती करण्याची त्यांची तयारी नव्हती. इभ्रत नावाच्या एका गोष्टीला कोणतंही सत्तारूढ सरकार न्यायापेक्षा आणि सत्यापेक्षां अधिक जपत असतं. स्वत:च्या इभ्रतीला धक्का लागू न देतां माझ्या अटकेमुळे होणारे लोकक्षोभाचे प्रकार टाळतां आले तर टाळण्याची कोल्हापूर सरकारची इच्छा होती...

बॅरिस्टर केळवकरांच्या प्रश्नांतला हा समग्र अभिप्राय माझ्या लक्षांत यायला वेळ लागला नाही. मी त्यांना म्हटले, ''तुम्ही मला पकडलं आहांत, आतां यांतून मार्ग मी काय काढणार? माझ्यावर खटला भरा, शिक्षा ठोठावा, माझी तुरुंगांत रवानगी करा...''

केळवकर एकदम म्हणाले ''छे छे! तसलं कांही आम्हांला करायचं नाही...''

मी म्हटलं ''मग मला सोडून द्या. मला पकडतांना वॉरंट तर दाखवलं नाहीच परंतु इकडे मला अटकेंत ठेवल्याला चार घटका झाल्या तरी कोणत्या आरोपाखाली मला पकडण्यांत आलेलं आहे ते मला सांगण्यात आलेलं नाही! हा प्रकार शुद्ध दंडेलीचा आहे. ही दंडेली तुम्हाला योग्य वाटत असेल तर तुम्ही माझ्यावर खटला भरून मला शिक्षा द्यावी हाच पुढचा मार्ग. उलट, माझी अटक अन्यायाची वाटत असेल तर मला ताबडतोब सोडून देणं हे तुमचं कर्तव्य आहे. यांपैकी जी गोष्ट तुम्हांला पसंत असेल ती करा.''

केळवकर म्हणाले, ''तुम्हांला सोडून देण्याची आमची इच्छा आहे.''

मी म्हटलं, ''मोठी मेहरबानी. मग सोडा तर मला.''

ते म्हणाले, ''पण या बाबतींत तुमचं थोडं सहकार्य आम्हांला पाहिजे.''

मी विचारलं, ''म्हणजे कसं म्हणतां?''

ते म्हणाले, ''घातपाताच्या या चळवळीपासून कॉलेजांतल्या आणि शाळांतल्या विद्यार्थ्यांना परावृत्त करण्याचं आश्वासन तुम्ही सरकारला द्या, म्हणजे तुम्हांला सोडण्याचं आमचं काम सोपं होईल.''

मी हंसून म्हटलं, ''तुमचं काम सोपं करणं हे माझं काम नव्हे. आणि शिवाय असं की तुम्ही मागतां त्या प्रकारचं आश्वासन मी कधीच देणार नाही.''

''यावर प्राईम मिनिस्टर मि. पेरी यांनी मला विचारलं, ''कॉलेजातील एक प्राध्यापक या नात्यानं अभ्यासांत व्यत्यय आणणाऱ्या चळवळीपासून विद्यार्थ्यांना परावृत्त करणं हे तुमचं कर्तव्य नाही का?''

मी म्हटलं, ''मुळीच नाही. कॉलेजांतील एक प्राध्यापक या नात्यानं जो विषय माझ्याकडे सोपविण्यात आला आहे तो उत्तम प्रकारे शिकविणं एवढं एकच माझं कर्तव्य ठरतं.''

मि. पेरी म्हणाले, ''पण त्याच्या जोडीला विद्यार्थ्यांना सन्मार्गावर ठेवणं हे कर्तव्य तुम्ही मानीतच नाही?''

मी म्हटलं, ''मानतो ना. आणि म्हणूनच देशांत सुरू होत असलेल्या नव्या राजकीय चळवळीपासून आलिप्त राहण्याचा उपदेश मला विद्यार्थ्यांना करतां येणार नाही.''

मि. पेरी म्हणाले, ''म्हणजे या चळवळीत विद्यार्थ्यांनी पडावं असं तुमचं मत आहे काय?''

मी नुकताच वाचून दूर ठेवलेला त्या दिवशीचा 'टाईम्स'चा अंक टेबलावर पडला होता, तो उचलून, उघडून, त्यातील एका कॉलमांतली बातमी पेरींना दाखवून मी म्हटलं, ''मि. पेरी, तुमच्या देशांतल्या एका मोठ्या विश्वविद्यालयांत पदवीदान प्रसंगी चॅन्सेलरनं विद्यार्थ्यांना केलेल्या उपदेशाचा गोषवारा 'टाईम्स'मध्यें आला आहे तो पहा. तुमच्या ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटीच्या व्हाईस चॅन्सेलरनं विद्यार्थ्यांना चक्क असं सांगितलेलं आहे की देशाच्या स्वातंत्र्यासाठी युद्ध चालू असता विद्यार्थ्यांची जागा कॉलेजांत नाही, रणांगणावर आहे.''

पेरींनी मी दाखविलेला मजकूर वाचला, आणि माझ्याकडे पाहून ते म्हणाले, ''तुमच्याशी वाद करणं कठीण आहे.''

मी हसलो, व म्हटलं, ''म्हणूनच म्हणतो आपल्या या बैठकींत काही निष्पन्न होणार नाही.''

केळवकरनी मला विचारलं, ''मग आम्हांला हवं तसं आश्वासन तुम्ही देणार नाही म्हणायचे?''

मी मान हलविली. ते निघून गेले!

रात्रभर मी अटकेतच होतो. ज्या ठिकाणी मला ठेवण्यांत आलं होतं तेथे एका भिंतीवर एक मोठा काळा फलक होता. घरफोडी, चोऱ्या, दरोडे, खून असले गुन्हे करणारे किती लोक पकडण्यात आले त्याची तारीखवार नोंद त्या फलकावर खडूने करण्यात आलेली मला दिसत होती. फळ्यावरच्या त्या तक्त्याकडे पाहून माझं मन अनेक विचारांनीं विषण्ण झालं. त्या विचारांच्या सोबतीतच माझी ती रात्र गेली.

दुसऱ्या दिवशीं सकाळी माझ्यावरचं आरोपपत्र मला देण्यांत आलं. प्रस्थापित राजसत्ता उलथून पाडण्यासाठी सशस्त्र उठाव केल्याचा आरोप माझ्यावर ठेवण्यांत आला होता! तो आरोप वाचून मला हंसूच आलं. मला भेटण्यासाठी काही वकील मित्र आले होते त्यांचंही ते आरोपपत्र पाहून मोठं मनोरंजन झालं. माझ्यावरील खटल्याचं काम सुरू झालं तर माझ्याविरुद्ध कोठला पुरावा दाखल करून सरकार आपली बाजू मांडणार होतं ते परमेश्वरालाच माहीत!

परंतु गंमत अशी की जे एक परमेश्वराला माहीत होतं ते जगाला कळण्याची वेळच आली नाही. कोणती चक्र कशी फिरली कोण जाणे, परंतु नंतर घटकाभरांतच डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस माझ्याकडे आले व म्हणाले, ''तुमची सुटका करण्याचा हुकुम झाला आहे. बाहेर गाडी तयार आहे. तुम्ही घरी जाऊ शकतां.''

मी आश्चर्यानं विचारलं, ''तुम्ही काय म्हणता याचा अर्थच कळत नाही मला! घटकेपूर्वी हे आरोपपत्र मला देता काय, आणि आता मला सोडलं म्हणून सांगता काय?''

ते म्हणाले, ''भालजी पेंढारकरांनी तुमच्यासाठी पाचशे रुपयांचा जामीन भरला आहे. तुमची सुटका करण्यात येत आहे.''

नंतर मी घरी गेलो. परंतु जो प्रकार झाला त्याला हंसावं की रडावं मला कळत नव्हतं. माझ्यावर ठेवलेला आरोप, त्या आरोपांतून जामीनावरील मुक्ततेची कायद्यांत तरतूद नसतांनाही घेण्यात आलेला जामीन आणि त्या जामीनाची अवघी पांचशे रुपयांची रक्कम, यापैकी कोणती गोष्ट अधिक हास्यास्पद होती तें सांगणं कठीण होतं!

रविवार ता. १६ ऑगस्ट रोजी झालेला हा प्रकार म्हणजे कोल्हापूर सरकार आणि कोल्हापूरची जनता यांच्यामधील लढाईतली पहिली फेरी होती. सरकारनं सारे पुढारी गिरफदार करून तुरुंगात घातले होते, तरी देशांतले सामान्य लोक बावरून गेले नाहीत, किंवा निष्क्रिय राहिले नाहीत. 'चले जाव'च्या घोषणेतलं मर्म त्यांनी ओळखलं होतं. आणि प्रस्थापित सरकारचा अधिकार खिळखिळा करून टाकण्याचे जे जे मार्ग त्यांना दिसले त्या त्या मार्गांनी ते धैर्यानं जाऊ लागले. विध्वंसक कृत्यं करणारी जनता आणि दडपशाही करणारं सरकार यांच्यात सगळीकडे जें निकराचं युद्ध पेटलं त्याच्या ज्वाला कोल्हापूरच्या राज्यांतही भडकू लागल्या. लोकांच्या साहसी कृत्यांच्या नव्या नव्या बातम्या रोज कानावर येऊ लागल्या. केवळ सरकारची किंचितही दहशत उरली नाही हे सिद्ध करण्यासाठी लोक सकृत दर्शनी अशक्य वाटणारे पराक्रम करूं लागले. त्यांना संकटाची फिकीर राहिली नाही. मृत्यूचं भय उरलं नाही. अगदी सामान्य स्त्री पुरुष वीरकृत्य करण्यास पुढे सरसावले...

भोवताली हे सारं घडत असतांना माझ्या मनांत येऊ लागलं, आपण ह्यावर एखादी कादंबरी का लिहू नये! त्या वेळेस भारत स्वतंत्र नव्हता. लेखकाची लेखणीही स्वतंत्र नव्हती. परंतु देशांत सुरू झालेल्या अभूतपूर्व चळवळीच्या विषयाचा मोह मला आवरतां येत नव्हता. या चळवळीवर कादंबरी लिहावी की न लिहावी याबद्दलचा विचार करण्यांत मी कित्येक दिवस घालविले. अखेर जे लिहावसं वाटतं ते लिहिण्याचं स्वातंत्र्य आम्हा हिंदी कादंबरीकारांना कितपत आहे याची एकदा परीक्षा पहाण्यासाठीच का होईना कादंबरी लिहिण्याचं मी ठरविलं. ही कादंबरी लिहीत असताना मला सारखं वाटत होतं की मी कितीही जपून लिहिलं तरी कायद्याचं भय टाळणं मला कठीण जाणार आहे. परंतु ललित लेखकाच्या स्वातंत्र्याची परीक्षा मला पाह्यची होती, त्याच्या कलेला जखडणाऱ्या कायद्याच्या मर्यादा लोकांना दाखवून देण्याची माझी इच्छा होती. म्हणून मी लिहीत गेलो. ऑगस्ट क्रांतीच्या त्या चळवळींत खुद्द कोल्हापूर शहरांत आणि भोवतालच्या भागांत एकाहून एक अधिक विलक्षण असे जे प्रकार घडत होते त्यांपैकी काहींची निवड करून माझ्या नव्या कादंबरीला योग्य असं कथानक मी जुळविलं. कादंबरीत शक्य तों जहाल राजकारण आणायचं नाही, असं मी मनाला शिकवित होतो, आणि तरी मनांतल्या मनांत मी समजून चुकलो होतों की कादंबरी मी कशाही प्रकारे लिहिली तरी कायद्याचं उल्लंघन टाळणं मला